242

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ३१/०१/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०२३/६९०/प्र.क्र.१७४/विशा-१अ, दिनांक ३० जानेवारी, २०२४.

**विषय :-** महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणूक २०१९ च्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तैनात करण्यात आलेल्या कंपन्यासाठी नागालॅड राज्यास प्रदान करण्याकरीता रुपये ८,४०,७५,२७०/- इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०२३/६९०/प्र.क्र.१७४/विशा-१अ, दिनांक ३० जानेवारी, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०१३०१५५६१३९५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक- २१

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणूक २०१९ च्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तैनात करण्यात आलेल्या कंपन्यासाठी नागालॅड राज्यास प्रदान करण्याकरीता रुपये ८,४०,७५,२७०/- इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण १०२३/६९०/प्र.क्र.१७४ /विशा-१अ
मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३० जानेवारी, २०२४.

**संदर्भ :-** पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२१/७२७२/ विधानसभा निवडणुक/२२८/२०१९, दिनांक १९.०५.२०२२ व २२.१२.२०२३.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणूक २०१९ मध्ये दि.०७/१०/२०१९ ते दि.३१/१०/२०१९ या कालावधीत नागालॅड राज्याच्या कंपन्या महाराष्ट्रात विविध प्रसंगी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तैनात करण्यात आल्या होत्या. सदरहू कंपन्यावर रु.८,५९,००,०००/- इतका खर्च झाला आहे. तसेच महाराष्ट्र राज्याच्या कंपन्या नागालॅड राज्यामध्ये दि.०१/०४/१९६९ ते दि.३०/०६/१९६९ या कालावधीत पाठविण्यात आले होते. सदर कंपन्यांवर रु.१८,२४,७३०/- इतका खर्च झाला आहे. सदर रक्कम वजा जाता रुपये ८,४०,७५,२७०/- इतकी प्रलंबित रक्कम अदा करावयाची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात विधानमंडळाच्या डिसेंबर-२०२३ हिवाळी अधिवेशनात बाब क्रमांक १९ महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणूक २०१९ मध्ये दि.०७/१०/२०१९ ते दि.३१/१०/२०१९ या कालावधीत नागालॅड राज्याच्या कंपन्या महाराष्ट्रात विविध प्रसंगी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तैनात करण्यात आल्या होत्या. सदर कंपन्यांवरील खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी रुपये ८,४०,७५,२७०/- (अक्षरी रुपये आठ कोटी चाळीस लक्ष पंच्याहत्तर हजार दोनशे सत्तर फक्त) इतकी रक्कम पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत असून, सदरचा निधी वितरीत करण्यास व खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी आणि त्यांच्या अंतर्गत आहरण व संवितरण अधिकाऱ्यास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. सदरचा खर्च " मागणी क्र.बी-१,२०५५, पोलीस (००) ११७ अंतर्गत सुरक्षा (००) (०२) इतर राज्याकडून मागविलेली अंतर्गत सुरक्षा ५०-इतर खर्च (२०५५ए ०६१) " या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या सन २०२३-२४ च्या पूरक अनुदानातून भागविण्यात यावा.

Scanned with CamScanner

४. पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत असलेला संपूर्ण निधी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२३/२०२४/व्यय-७, दि.१८.०१.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०१३०१५५६१३९५२९ असा असून डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAHANGIR KYAMUDDIN KHAN

Digitally signed by JAHANGIR KYAMUDDIN KHAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=0514d0441bc151d360aa9723b622b5ac853f58450638828ec27f54c83e1c36e9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D8DF82CCD86411440F872E806944C68D20B4533D6C7D7079D601D1337F7E8B66, cn=JAHANGIR KYAMUDDIN KHAN
Date: 2024.01.30 15:56:05 +05'30'

**( जहांगीर के. खान )**
**महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, मंत्रालय, मुंबई
६. पोलीस आयुक्त, मुंबई.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर
९. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग यांचे स्वीय सहायक.
१०. संचालक,नागरी संरक्षण संचालनालय, मुंबई
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / बांद्रा.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. कक्ष अधिकारी (अर्थ-१), गृह विभाग,मंत्रालय, मुंबई.
१४. वित्त विभाग, व्यय-४ / व्यय-७, मंत्रालय, मुंबई.
१५. सामान्य प्रशासन विभाग, कार्या.३३ व का.२१ (रोखशाखा), मंत्रालय, मुंबई-३२.
१६. निवडनस्ती (कार्यासन विशा-१अ).



Scanned with CamScanner